# कृषि पणन विषयक बातम्या : ऑक्टोबर 2024

Agrowon, 30/10/2024

# इजिप्त, तुर्कीचा किरकोळ कांदा दुबईमार्गे भारतात

## मागणी, दर नियंत्रणासाठी आयात; मात्र दराचा फटका

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नाशिक : राज्यातील प्रमुख बाजार समित्यांमध्ये उन्हाळ कांद्याची आवक कमी झाली आहे. अत्यंत कमी प्रमाणात नवीन खरीप कांदा बाजारात येत आहे. सध्या मागणीच्या तुलनेत पुरवठा मर्यादित असल्याने कांद्याचे दर टिकून आहेत. त्यातच गेल्या पंधरवड्यात पावसामुळे कांद्याचे मोठे नुकसान झाले. दरम्यान, देशात दुबईमार्गे इजिप्त व तुर्कीमधील कांदा दाखल झाला आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे.

केंद्र सरकारने कांद्याचे दर नियंत्रणात ठेवण्यासह भाव स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत 'नाफेड' व 'एनसीसीएफ' या दोन संस्थांच्या माध्यमातून पावणेपाच लाख टन कांदा खरेदी केली गेली. एकीकडे हा बफर स्टॉकमधील कांदा बाजारात येत आहे, असे असताना कांदा आयातीला परवानगी दिल्याने केंद्र सरकारच्या धोरणावर टीका होत आहे. ग्राहकांना कांदा स्वस्त दरात मिळण्यासाठी सरकारने यापूर्वी वाणिज्य, ग्राहक व्यवहार व अर्थ मंत्रालयाच्या माध्यमातून हस्तक्षेप केला आहे. कांद्याचे बाजारभाव नियंत्रणात ठेवण्यासाठी इजिप्त व तुर्कीमधून ५ कंटेनर कांदा भारतात दाखल झाला आहे.

### दुसऱ्यांदा आयात; मात्र दराचा ताळमेळ बसेना

पहिल्यांदा २४ सप्टेंबर रोजी अफगाणिस्तानातील ३०० टन कांदा ११ ट्रकमधून रस्तामार्गे पंजाब राज्यातील अमृतसर व जालंदर या शहरांमध्ये दाखल झाला होता. आता दुसऱ्यांदा इजिप्त व तुर्कीमधून १२० टन कांदा दाखल झाला आहे. पुण्यात २, बंगळूर २ व मुंबई १ कंटेनर कांदा पाठविण्यात आला आहे. बंदरावर उतरल्यानंतर त्याची आयात किंमत ३२ ते ३४ रुपये किलो होती. हा कांदा विक्रेत्यांना पोहोच होईपर्यंत त्यांची किंमत प्रतिकिलो ४२ रुपयांपर्यंत गेला, मात्र किरकोळ विक्री ३५ ते ३८ रुपये दरम्यान झाली. त्यामुळे आयातदाराला किलोमागे ३ ते ४ रुपये तोटा झाला. एकंदरीत आयात झालेल्या कांद्याच्या आयातीची बाजारातील स्थिती अनुकूल नाही. गुणवत्ता व दरात ताळमेळ बसत नसल्याने आयात होऊनही हा कांदा फायद्यात नसल्याचे हॉर्टिकल्चर प्रोड्यूसर एक्स्पोर्ट असोसिएशनचे उपाध्यक्ष विकास सिंग यांनी सांगितले.

Punyanagari, 18/10/2024

# बारामती मार्केट कमिटीच्या मुख्य आवारात हमीभाव; सोयाबीन खरेदी केंद्राचा शुभारंभ



**बारामती : प्रतिनिधी**

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मंगळवारी (दि. १५) मार्केट कमिटीच्या मुख्य आवारात यांत्रिक चाळणी येथे हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्राचा शुभारंभ सभापती सुनील पवार यांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी मार्केटिंग फेडरेशन पुणे जिल्हा पणन अधिकारी पवार, बाबालाल काकडे, नीरा कॅनॉल संघाचे चेअरमन सतीश काकडे, सदस्य राहुल जगताप, अधिकारी अमोल कदम, प्रशांत मदने व बाजार समितीचे सदस्य दत्तात्रय तावरे, विभागप्रमुख सूर्यकांत मोरे उपस्थित होते.

केंद्र शासनाचे किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत नाफेडमार्फत हंगाम २०२४-२५ मध्ये मूग, उडीद, सोयाबीन खरेदीसाठी नाव नोंदणी सुरू आहे.

पुणे जिल्ह्यातील मूग, उडीद, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली नाही, अशा शेतकऱ्यांनी मुदतीत नाव नोंदणी करण्याचे आवाहन बारामती बाजार समितीने केली. ज्या शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. अशा शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे शेतमाल घेऊन येण्याची तारीख कळविण्यात येते. त्याच दिवशी शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रावर आपला माल आणावा.

पहिल्या दिवशी ६ शेतकऱ्यांचे ४० क्विंटल सोयाबीन खरेदी करण्यात आले. वाळलेला व स्वच्छ असलेला शेतमाल खरेदी करण्यात येणार असल्याची माहिती सचिव अरविंद जगताप यांनी दिली. या शासनाचे हमीभाव केंद्रावर शेतमाल देऊन शेतकऱ्यांनी हमीभाव योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले.

पुण्य नगरी

# बाजार समित्यांमधील सेस पूर्वीप्रमाणे

## ७५ पैसे व एक रुपयाप्रमाणेच वसुली होणार

**पुणे** : राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून क्षेत्रातील खरेदी विक्री केलेल्या कृषी उत्पन्नाच्या बाजार फीमध्ये अर्थात सेसमध्ये कपात करून प्रत्येकी शंभर रुपयांच्या खरेदीवर किमान पंचवीस व कमाल पन्नास पैसे (सेस) अर्थात बाजार फी निश्चित केल्याची अधिसूचना शासनाने काढली होती. त्यामध्ये पुन्हा बदल करून पूर्वीप्रमाणेच बाजार पंचाहत्तर पैसे व एक रुपया अशी बाजार फी निश्चित केली आहे. यामुळे बाजार समित्यांना दिलासा मिळाला आहे.

दुसरीकडे बाजार फी शासनाने कमी केल्याचा आनंद व्यापाऱ्यांसाठी अल्पकाळाचा ठरला असून, व्यापाऱ्यांमध्ये मात्र अस्वस्थता पसरली आहे. बाजार समिती फीसंदर्भात शासनाने घेतलेला निर्णय अवघ्या एका दिवसात फिरवण्याची नामुष्की आली आहे. शासनाने बाजार फीमध्ये केलेल्या कपातीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाने शासनाकडे केलेल्या मागणीला यश आहे. अधिसूचनेमुळे राज्यातील बाजार समित्यांमध्ये कमालीची अस्वस्थता पसरली होती.

> शासनाने सेस कपातीचा घेतलेला निर्णय रद्द केल्याने आणि सेस पूर्वीप्रमाणेच आकारण्याचा निर्णय घेतल्याने राज्यातील बाजार समित्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, पणनमंत्री अब्दुल सत्तार, छगन भुजबळ आणि दादा भुसे यांचे आभार.
>
> – **बाळासाहेब नाहाटा,** अध्यक्ष महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ

### सेस प्रकरणी न्यायालयात याचिका

शासनाने सेस कमी करण्याच्या घेतलेल्या निर्णयाविरोधात महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती बाळासाहेब नाहाटा यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री अजित पवार, छगन भुजबळ, मंत्री दादाजी भुसे यांची भेट घेऊन बाजार समित्यांची बाजू मांडली होती, उच्च न्यायालयात देखील याचिका दाखल करण्यात आली होती.

Pune Edition
Oct 16, 2024 Page No. 14
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# शासनाकडून बाजार फी कपातीचा निर्णय मागे

**पुढारी इफेक्ट**

- बाजार समित्यांकडून कडाडून झालेल्या विरोधानंतर दर पूर्ववत
- सेसची कपात प्रत्येक शंभर रुपयांच्या खरेदीवर पंचाहत्तर पैसे ते एक रुपया
- समित्यांना मोठा दिलासा; बाजार समिती संघाची शिष्टाई यशस्वी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून कडाडून झालेल्या विरोधानंतर 'बाजार फी'च्या (सेस) दरात कपात करण्याचा निर्णय राज्य सरकारने तत्काळ मागे घेतला आहे. शासनाने मंगळवारी (दि.१५) नव्याने अधिसूचना जारी करून सेसची कपात पूर्ववत म्हणजे प्रत्येक शंभर रुपयांच्या खरेदीवर पूर्ववत म्हणजे पंचाहत्तर पैसे ते एक रुपया केल्यामुळे बाजार समित्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

याकामी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या शिष्टमंडळाने शासनाकडे केलेल्या पाठपुराव्यास यश आले असून सेसच्या दर कपातीमुळे समित्यांची विस्कटणारी संभाव्य आर्थिक घडी पूर्ववत राहण्यास मदत होण्याची अपेक्षा समित्यांच्या वर्तुळातून व्यक्त होत आहे. राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून खरेदी-विक्रीवरील प्रत्येक शंभर रुपयांच्या खरेदीवर किमान २५ पैसे ते कमाल ५० पैसे असा दर निश्चित करण्याची अधिसूचनाही १० ऑक्टोबरला जारी केली. यामुळे सेसद्वारे मिळणारे प्रमुख उत्पन्न असलेल्या राज्यातील ३०६ बाजार समित्यांचे उत्पन्न थेट ९०० कोटी रुपयांवरून पन्नास टक्क्यांनी खाली येणार होते. समित्यांच्या आर्थिक डोलारा अडचणीत येण्याच्या मुद्यास दै. 'पुढारी'ने सर्वप्रथम वाचा फोडली होती.

दरम्यान, सेस कपातीच्या या निर्णयाचा फायदा शेतकरी आणि बाजार समित्यांशिवाय खरेदीदार व्यापाऱ्यांना होणार असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यामुळे शासनाच्या निर्णयाचे व्यापारी वर्गाकडून स्वागतही केले होते. मात्र, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या शिष्टमंडळाने याकामी शासनाकडे सोमवारी (दि.१४) मंत्रालयात जाऊन बाजार समित्यांची सविस्तर माहिती आणि भूमिका स्पष्ट केली होती. त्यामुळे सरकारने याप्रश्नी तातडीने दखल घेत मंगळवारी सेस कपातीचा निर्णय रद्द करून पूर्वीप्रमाणेच रक्कम कपात कायम करण्यावर शिक्कामोर्तब केले आहे.

याबाबत बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नाहाटा म्हणाले, सेस कपातीच्या अधिसूचनेमुळे राज्यातील बाजार समित्यांमध्ये कमालीच अस्वस्थता पसरली होती. समित्यांनी घेतलेले बाजार आवारातील पायाभूत सुविधांकरिताचे कर्जांची परतफेड, कर्मचाऱ्यांचे पगार व अन्य कामे करण्यास मर्यादा येणार होत्या. याकामी सोमवारी बाजार समिती संघाच्या शिष्टमंडळाने सर्व अडचणी सांगण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री छगन भुजबळ, दादा भुसे यांची भेट घेऊन सेस कपातीची अधिसूचना मागे घेण्याची विनंती केली होती. शिवाय बाजार समिती संघाने मुंबई उच्च न्यायालयात याचिकाही दाखल केलेली होती. या बाबत सेसचे दर पूर्ववत केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, छगन भुजबळ, दादा भुसे, पणनमंत्री अब्दुल सत्तार यांचे बाजार समित्यांच्या वतीने आम्ही आभार मानत आहोत.

### बाजार समित्या, खासगी बाजारांनी कार्यवाही करावी : पणन संचालक

शासनाने मंगळवारी 'बाजार फी'चे दर पूर्ववत करण्याची अधिसूचना जारी करताच राज्याचे पणन संचालक विकास रसाळ यांनी परिपत्रक जारी केले. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या कलाम ३१ नुसार शेतमाल खरेदीवर शासनाने अधिसूचनेद्वारे घालून दिलेल्या मर्यादेमध्ये बाजार फी आकारणी ही राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि खासगी बाजार यांना बंधनकारक आहे. त्यामुळे अधिसूचनेनुसार बाजार फी वसूल करण्याबाबतची कार्यवाही राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या व खासगी बाजारांनी करावी, असे परिपत्रकात नमूद केले आहे.

Pune Gramin Edition
Oct 16, 2024 Page No. 09
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# 'बाजार फी'च्या दरातील सुधारणेसाठी मंत्रिस्तरीय अभ्यास समिती गठित

पुणे : पुढारी वृत्तसेवा

कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये आकारण्यात येत असलेल्या बाजार फीच्या (सेस) दरामध्ये सुधारणा करण्यासाठी मंत्रिस्तरीय पाचसदस्यीय अभ्यास समिती पणनमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

तसेच, सेस कपातीची अधिसूचना स्थगितीचा निर्णय मंत्रिमंडळाने सोमवारच्या (दि.१४) बैठकीत घेतल्याचे म्हटले आहे. या समितीने बाजार फीच्या दरामध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने शासनास अहवाल सादर करावेत, असेही शासन आदेशात नमूद केले आहे.

मंत्रिमंडळाच्या दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या बैठकीत शासन अधिसूचना दिनांक १० ऑक्टोबर २०२४ अन्वये विहित केलेल्या दरात सुधारणेच्या अनुषंगाने मंत्रिस्तरीय अभ्यास समिती नेमण्यात यावी व या समितीचा अहवाल प्राप्त होईपर्यंत ही अधिसूचना स्थगित करण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, पूर्वीच्या म्हणजे दिनांक ७ ऑक्टोबर १९८६ च्या अधिसूचनेन्वये बाजार फीचे दर पूर्ववत म्हणजे किमान पंचाहत्तर पैसे ते शंभर पैसे दर कायम ठेवण्यात आले आहेत.

- **सेस कपात अधिसूचना स्थगितीचा मंत्रिमंडळाचा निर्णय**
- **शासनाला अहवाल सादर करण्याचे आदेश**

## पाच सदस्यांची नावे

पणनमंत्री अब्दुल सत्तार (अध्यक्ष), तर सदस्यांमध्ये महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, कृषिमंत्री धनंजय मुंडे आणि सहकार व पणनचे अपर मुख्य सचिव समन्वयक राहतील, असेही आदेशात नमूद केले आहे.

# सेसवरून बाजार समित्या अडचणीत?

## एक रुपयावरुन २५ ते ५० पैसे आकारण्याचा निर्णय; व्यापाऱ्यांकडून स्वागत

सकाळ वृत्तसेवा

**मार्केट यार्ड, ता. १४ : राज्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये १०० रुपयांच्या खरेदी-विक्रीवर आता किमान २५ पैसे आणि कमाल ५० पैसे बाजार शुल्क (सेस) आकारण्यात येणार आहे. या निर्णयाचे व्यापाऱ्यांनी स्वागत केले असले, तरी आधीच अडचणीत असलेल्या बाजार समित्या आणखी अडचणीत येण्याची शक्यता आहे.**

राज्यातील बाजार समित्यांमध्ये आलेल्या शेतमालावर १०० रुपयांच्या खरेदीवर ७५ पैसे ते एक रुपया सेस आकारण्यात येत होता. सेस रद्दच्या मागणीसाठी राज्यातील व्यापारी अनेक वर्षांपासून प्रयत्नशील होते. यासाठी व्यापारी संघटनांनी अनेकदा आंदोलनेही केली. त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने सेस कमी करत एक रुपयावरून २५ ते ५० पैशांपर्यंत केली आहे. नियमन मुक्तीनंतर बाजार समिती आवाराबाहेर व्यापार वाढला आहे. या निर्णयामुळे बाजार आवारातील व्यापार वाढण्यास मदत होईल, असे व्यापारी संघटनांनी सांगितले.

व्यापार वाढण्यास मदत होईल असे बोलले जात असले, तरीही बाजार समित्यांचे उत्पन्न अर्ध्यावर येणार आहे. कारण बाजार समित्यांच्या उत्पन्नाचा मूळ स्रोत सेस आहे. या निर्णयाने त्याला धक्का बसणार आहे. त्यामुळे विकासकामे कशी करायची? असा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. या निर्णयाविरोधात राज्यातील काही बाजार समित्या उच्च न्यायालयात धाव घेण्याची तयारीत असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान व्यापारी संघटनांनी निर्णयाचे स्वागत करत आनंद व्यक्त केला आहे.

### पुणे बाजार समितीचे उत्पन्न ३५ कोटींवर येणार

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीला सेसच्या माध्यमातून वार्षिक उत्पन्न अंदाजे ७० कोटी रुपये आहे, ते आता ३५ कोटींवर येणार आहे. बाजार समितीचा आस्थापना खर्च अंदाजे ४० कोटी रुपयांपर्यंत आहे. त्यामुळे इतर विकासकामे कशी करायची? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### विविध संघटनांकडून पाठपुरावा

राज्यातील व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर (मुंबई), फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई), चेंबर ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रीज अँड ट्रेड (मुंबई), दि ग्रेन, राइस अँड ऑइल सीड्स मर्चंट्स असोसिएशन (मुंबई) व दि पूना मर्चंट्स चेंबरच्या (पुणे) संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती स्थापन केली होती. व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २६ ऑगस्ट २०२४ रोजी मुंबई येथे व्यापारी संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत उच्चस्तरीय बैठक झाली होती.

या बैठकीत मंत्री मंगलप्रभात लोढा आणि आमदार माधुरी मिसाळ उपस्थित होत्या. यामध्ये एक महिन्याच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश फडणवीस यांनी दिले होते. शासनाने व्यापाऱ्यांच्या प्रश्नांबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन निर्णय घेतला आहे.

याबद्दल कृती समितीने समाधान व्यक्त केले आहे, अशी माहिती कृती समितीचे समन्वयक राजेंद्र बाठिया आणि दि पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष रायकुमार नहार यांनी दिली.

> सेस कमी झाल्यामुळे बाजार समिती आवारातील व्यापार वाढण्यास मदत होईल. नियमन मुक्तीद्वारे व्यापार करणाऱ्यांशी स्पर्धा करता येणार आहे. याबाबत अडते असोसिएशनने पणनमंत्र्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. संघटनांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.
>
> - **अनिरुद्ध भोसले,** अध्यक्ष, श्री छत्रपती शिवाजी महाराज अडते असोसिएशन

> या निर्णयामुळे राज्यातील बाजार समित्यांचे उत्पन्न निम्म्याने कमी होणार आहे. याबाबत बाजार समिती संघाकडे आमची भूमिका मांडणार आहे. बाजार समिती संघ पुढील पाऊल उचलेल. संघाने भूमिका न घेतल्यास आम्ही वैयक्तिक न्याय मागण्यासाठी न्यायालयात जाऊ.
>
> - **दिलीप काळभोर,** सभापती, पुणे बाजार समिती

> महाराष्ट्र शासनाने कृषी उत्पन्न बाजार समितीतील सेस कमी करण्याबाबत घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. कारण येथील व्यापार वाढीसाठी व बहुराष्ट्रीय कंपन्यांबरोबर स्पर्धा करण्यासाठी त्याचा उपयोग होईल. जरी सेस कमी झाला असला, तरी व्यापार वाढल्याने बाजार समित्यांचे उत्पन्न चांगले होईल.
>
> - **राजेंद्र बाठिया,** समन्वयक, राज्य व्यापारी कृती समिती

> या निर्णयाला बाजार समिती महासंघाचा विरोध आहे. याबाबत पुढील दोन ते तीन दिवसांत भूमिका जाहीर करण्यात येणार आहे.
>
> - **प्रवीणकुमार नहाटा,** सभापती, महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघ

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# बाजार समित्यांचा सेसचा दर शेकडा २५ पैसे ते ५० पैशांवर

## बाजार फीच्या दरात कपात करण्याची शासनाकडून अधिसूचना जारी

## शेतकऱ्यांऐवजी खरेदीदार व्यापाऱ्यांची दिवाळी गोड

पुढारी वॉच

किशोर बरकाले
पुढारी प्रतिनिधी

**पुणे** : कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून बाजार क्षेत्रातील खरेदी-विक्री केलेल्या कृषी उत्पन्नाच्या प्रत्येकी शंभर रुपयांच्या खरेदीवर किमान २५ पैसे ते कमाल ५० पैसे, असा दर निश्चित करण्याची अधिसूचना राज्य सरकारने जारी केली आहे. पूर्वी हाच दर शेकडा ७५ पैसे ते एक रुपया असा होता. त्यामुळे बाजार समित्यांचे उत्पन्न सरासरी पन्नास टक्क्यांपर्यंत घटणार असल्याने समित्यांचे कंबरडे मोडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या निर्णयाचा फायदा शेतकरी व बाजार समित्यांऐवजी शेतमालाचे खरेदीदार व्यापाऱ्यांनाच होणार असल्याने त्यांची दिवाळी गोड झाली आहे.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या कलम ३१ च्या उपकलम (१) अन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन राज्य सरकारने दिनांक १० ऑक्टोबर रोजी अधिसूचना जारी केली आहे. त्यामध्ये दिनांक ७ ऑक्टोबर १९८६ च्या सेसबद्दलचा निर्णयात बदल करून सेसचा दर कमी करण्यात आल्याचे शासनाचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे उपसचिव संतोष देशमुख यांनी जारी केलेल्या अधिसूचनेत स्पष्ट केले आहे.

राज्यातील बाजार समित्यांमधील शेतमाल विक्रीवर सेसची वसुली ही खरेदीदार व्यापाऱ्यांकडून केली जाते. दरम्यान, बाजार पान ४ वर ▸

Pune Edition
Oct 14, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

# पुढारी

www.pudhari.com

## बाजार समित्यांचा सेसचा दर शेकडा २५ पैसे ते ५० पैशांवर

**(पान १ वरुन)** समित्यांची संख्या ३०६ इतकी असून त्यांना बाजार फीमधून (सेस) प्रत्यक्षात ९०० कोटी रुपयांचे वार्षिक उत्पन्न मिळते, अशी माहिती पणन मंडळातील अधिकाऱ्यांनी दिली. तर बाजार समित्यांमध्ये सुमारे ६० ते ६५ हजार कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल शेतमाल विक्रीमधून होते. सेसचे दर कमी केल्यामुळे बाजार समित्यांचे उत्पन्न पन्नास टक्क्यांनी घटणार असल्यामुळे समित्यांचे कामकाज, दैनंदिन बाजार आवाराची देखभाल, सेवा सुविधा पुरविणे आणि कर्मचाऱ्यांचे वेतन कसे देणार? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच समित्यांनी विविध विकास कामांसाठी बँकांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करणार? याबद्दलही प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे सांगण्यात आले.

### राज्य बाजार समिती संघ कोणती भूमिका घेणार?

शासनाच्या अधिसूचनेवर बाजार समित्यांचे नेतृत्व करणाऱ्या महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाची याबद्दलची भूमिका आता महत्वपूर्ण राहणार आहे. कारण बाजार समिती संघाने नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय परिषदेमध्ये सेसचा दर शेकडा एक रुपयांवरुन दोन रुपये करण्याची मागणी केली होती. त्यामुळे वाढ होण्याऐवजी सेसचा दर घटविण्यात आल्याने ऐन विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत हा विषय आणखी ऐरणीवर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिवाय पणन संचालनालयासही या अधिसूचनेवर परिपत्रक जारी करावे लागण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, गाव मौजे किवळे येथील जुना सर्व्हे नं. ७४, हिस्सा नं. १ब/२, नवीन सर्व्हे नं. ७४ हिस्सा नं. १ब / २ अ येथील मिळकतीबाबत नोंदविला गेलेला मूळ/ओरिजिनल खरेदीखत दस्त क्र. ४९४७/२००८ सब रजी. हवेली क्र. १४, लिहून घेणार - कौशिक दिलीपराव देशमुख यांसी लिहून देणार - एस. आर. गेंगजे यांचेतर्फे कु. मु. धारक म्हणून कैलाश नामदेव भोईर येणेप्रमाणे खरेदीखत दस्त, पुणे ते नागपूर रस्त्याचे दरम्यान हरविला असून सदर मूळ/ओरिजिनल खरेदीखत दस्त क्र. ४९४७/२००८ सब रजी. हवेली क्र. १४ कोणासही आढळून आल्यास कौशिक दिलीपराव देशमुख यांना फोन नं. ९७६४४३२९२२ या क्रमांकावर सात दिवसांत संपर्क करावा.

त्याबाबत नोटीस प्रसिद्ध केली आहे.

Pune Edition

Oct 14, 2024 Page No. 08

Powered by: erelego.com

Agrowon, 14/10/2024

# सेंद्रिय शेतीमाल निर्यातीच्या संधी वाढणार

## ‘एनपीओपी’च्या मार्गदर्शक तत्त्वातील सुधारणा अंतिम टप्प्यात; यंदा निर्यातीने घेतली ३० टक्क्यांची उसळी




**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) : सेंद्रिय उत्पादनांची निर्यात संधी वाढणे आणि ती सुकर होण्यासाठी ‘अपेडा’कडून मार्गदर्शक तत्त्व व नियमांमध्ये सुधारणा करण्यात येत आहे. सेंद्रिय शेतीमालासंबंधी राष्ट्रीय कार्यक्रमात (एनपीओपी) सुधारणा करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. यातील काही नव्या सुधारणांमुळे भारतातील सेंद्रिय माल उत्पादनांच्या निर्यातीला चांगली चालना मिळाली आहे.**

भारताच्या सेंद्रिय उत्पादनांच्या निर्यातीला चालना मिळावी यासाठी वाणिज्य मंत्रालयाच्या अपेडा संस्थेकडून ‘एनपीओपी’ हा कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. या संदर्भात बोलताना अपेडाचे अध्यक्ष अभिषेक देव म्हणाले, की दहा वर्षांच्या या काळानंतर आता अपेडाने ‘एनपीओपी’ या कार्यक्रमांतर्गत सुधारित मार्गदर्शक तत्त्वे व नियमावली आणण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ती अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. त्यामध्ये सेंद्रिय उत्पादकांना शेतीमाल प्रमाणीकरण संस्था बदलणेही शक्य होणार आहे. २०२०-२१ च्या दरम्यान सेंद्रिय मालाची निर्यात ९०० दशलक्ष डॉलर एवढ्या उंचावर पोहोचली होती. त्यानंतर तिची घसरण सुरू झाली होती. मात्र नव्या सुधारणा लागू केल्याने भारताच्या सेंद्रिय माल निर्यातीला पुन्हा चांगली चालना मिळाली आहे. यंदा निर्यातीने ३० टक्क्यांची उसळी घेतली आहे.

पान २ वर »

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# शेतकऱ्यांनी फळे व भाजीपाला हाताळणी सुविधेचा लाभ घ्यावा

- उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आवाहन
- जळोची उपबाजारातील केंद्राचे उद्‌घाटन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

फळे व भाजीपाल्याच्या हाताळणी व मूल्यसाखळी व्यवस्थेमध्ये ४० टक्के नुकसान होते. त्यासाठी जळोची उपबाजारात अत्याधुनिक सोयी-सुविधायुक्त फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राची उभारणी करण्यात आली असून, बारामतीच्या वैभवात भर टाकणारी ही बाब असल्याचे गौरवोद्‌गार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काढले.

राज्य सरकार, आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची उपबाजारात उभारण्यात आलेल्या फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ८) झाले, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेट प्रकल्पाचे संचालक विनायक कोकरे, उपसंचालक डॉ. अमोल यादव व कृषी पणन मंडळाचे इतर अधिकारी तसेच बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पवार व सर्व संचालक, सचिव अरविंद जगताप आणि शेतकरी उपस्थित होते.

संजय कदम म्हणाले, कृषी पणन मंडळने बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राची उभारणी केली आहे. या सुविधा केंद्रामध्ये कोल्ड स्टोअरेज, प्री-कूलिंग युनिट, पॅक हाऊस, द्राक्ष, केळी व डाळिंबासाठी ग्रेडिंग, सॉर्टिंग, पॅकिंग लाइनइत्यादी सुविधा आहेत.

My Pune Edition
Oct 12, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

सकाळ

# फळांच्या ब्रँडिंगसाठी सहकार्य करणार

## अजित पवार यांची ग्वाही : जळोची उपबाजारातील सुविधा केंद्राचे उद्‌घाटन

**काटेवाडी, ता. १० : ''शेतकऱ्यांच्या फळ व पिकांना प्रोत्साहन देऊन चांगला बाजारभाव मिळवून देण्याकरिता राज्य शासन प्रयत्नशील आहे. द्राक्ष, केळी, हापूस आंबा आणि डाळिंब आदी फळांना जागतिक जागतिक स्तरावर ब्रँडिंग करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा. याकरिता राज्य शासनाच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल,'' अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.**

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने येथे मंगळवारी (ता. ७) आयोजित नवीन उपबाजार आवार भूमिपूजन आणि महाराष्ट्र शासन आणि आशियाई विकास बँक अर्थसह्ययीत मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे जळोची उपबाजार येथे फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी पवार पुढे म्हणाले की, राज्यात एक हजार १०० कोटी रुपयांचा मॅग्नेट प्रकल्प २०२१-२२ ते २०२७-२८ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत तालुक्यातील डाळिंब, पेरू, द्राक्ष, केळी, आंबा अशा पिकांना चांगली बाजारपेठ मिळावी, निर्यातक्षम चांगले व्यापारी मिळावे, शेतमालाची व्यवस्थितपणे साठवणूक व्हावी या उद्देशाने बारामतीच्या वैभवात भर पडणारी अतिशय देखणी आणि अत्याधुनिक सोई-सुविधायुक्त फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राची उभारणी केली आहे. या सुविधा केंद्राचा शेतकरी व ग्राहकाला मोठ्या प्रमाणात लाभ होईल.



**जळोची (ता. बारामती) :** उपबाजारातील फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राचे उद्‌घाटन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार.

### अजित पवार म्हणाले...

- अल्प व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन सामूहिक विक्रीवर भर दिला पाहिजे.
- अत्याधुनिक संशोधन परदेशातून आयात केल्यास तसेच मूल्यसाखळी, विमा संरक्षण द्यावे
- निर्यात प्रोत्साहन, उत्पादन संस्थांना प्रोत्साहन आणि व्यावसायिक दृष्टिकोन विकसित केला जाईल
- राज्यातील भाजीपाल्याचे होणारे नुकसान टाळण्याकरिता शीतसाखळीगृह उभारणीवर दिला पाहिजे.

यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेटचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पवार, माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष केशवराव जगताप, संभाजी होळकर, सचिन सातव, नीलेश लडकत, विश्वास देवकाते, अजित बोरकर आदी उपस्थित होते.

### झारगडकरांकडून २१ एकर जमीन उपलब्ध

- **झारगडवाडी येथील बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन उपबाजाराकरिता एक रुपये नाममात्र दरात भाडेपट्टा करारान्वे शासनाने दिली असून, बाजार समितीची आठ कोटी रुपयांची बचत झाली आहे. याकरिता झारगडकरांनी २१ एकर जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. नवीन उपबाजारामुळे परिसराचा विकास होण्यास मदत होणार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.**

“ फळे व भाजीपाला हताळणी सुविधा केंद्राविषयी माहिती या केंद्रात प्रत्येकी १०० टनाचे ७ कोल्ड स्टोरेज, ३० टन क्षमतेचे प्रिकुलिंग युनिट, पॅक हाऊस, द्राक्ष, केळी व डाळिंबासाठी ग्रेडिंग, सॉर्टिंग, पॅकिंग लाईन, फ्रोजन फ्रुट स्टोरेज, ब्लास्ट फ्रिजर, सोलर सिस्टीम, फायर फायटिंग व विद्युतीकरण, मटेरिअल रिसिविंग व डिसपॅच एरिया, स्वच्छता गृह, कॅन्टिन व निवास व्यवस्था, पॅकिंग मटेरिअल स्टोरेज, टेस्टिंग लॅब आदी सुविधा उभारण्यात आल्या आहेत.

**- संजय कदम,** कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ

।। श्री साई प्रसन्न ।। ॐ साई

शाम स्टील
सर्व प्रकारचे अँगल, स्क्वेअर बार, राऊंड बार सर्व प्रकारचे स्क्वेअर ट्युब, राऊंड पाईप C चॅनल Z सेक्शन, फ्लॅट पट्टी, पन्हाळी पत्रे, सिमेंट पत्रे, एच.आर. & सी.आर.सी. शीटस, डोअर फ्रेम, टी म्युलम, डिझाईन व सर्व प्रकारचे फॅब्रीकेशन व बिल्डींग मटेरियल होलसेल दरात मिळेल.
प्रोप्रा. श्री.आप्पासाहेब गावडे
श्री.अनंतराव के. आटोळे
मोबाईल : ९०११८१८१११/९९२१४१२०४२
एस.टी. स्टॅंडच्या मागे नविन रिंग रोड, बारामती

साप्ताहिक
बारामती
# लोक वार्ता
३० वर्षाकडे वाटचाल...
संस्थापक - सौ.शुभांगी महाडीक
फोन : ९९२१८६२३०३/९३२६०३८९८९
E-mail :- lokwarta@yahoo.com
(MARATHI) Weekly Baramati Lokwarta • Publish on Thursday • RNI Regd No MAH MAR-2001/11754 • Estd ; 6 Sept. 1997
□ वर्ष २९ वे □ अंक ७ वा □ गुरूवार दि.१० ऑक्टोबर २०२४ □ किंमत २ रूपये

## राज्यातील फळांना जागतिक स्तरावर ब्रॅंडिंग करण्यासाठी राज्य शासनाचे सर्वतोपरी सहकार्य-उपमुख्यमंत्री अजित पवार

**बारामती:–** राज्यातील शेतकऱ्यांच्या फळांना व पिकांना प्रोत्साहन देऊन त्यांना चांगला बाजारभाव मिळवून देण्याकरीता राज्य शासन प्रयत्नशील आहे. द्राक्ष, केळी, हापूस आंबा आणि डाळिंब आदी फळांना जागतिक जागतिक स्तरावर ब्रॅंडिंग करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती आणि शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, याकरीता राज्य शासनाच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.




झारगडवाडी बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने येथे मंगळवारी (दि. ७ ऑक्टोबर) आयोजित नवीन उपबाजार आवार भूमिपुजन आणि महाराष्ट्र शासन आणि आशियाई विकास बँक अर्थसहायीत मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे जळोची उपबाजार येथे फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, मॅग्नेटचे प्रकल्प संचालक तथा सरव्यवस्थापक विनायक कोकरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील पवार, माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष केशवराव जगताप, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, बारामती सहकारी बँकेचे अध्यक्ष सचिन सातव, बाजार समितीचे उपसभापती निलेश लडकत, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विश्वास देवकाते, सरपंच अजित बोरकर आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांची असून त्यांच्या कष्टाचा सन्मान करुन शेतमालाला योग्य प्रकारे मोबदला मिळाला पाहिजे. ग्राहकाला दर्जेदार सेवा दिली पाहिजे, व्यापारी आणि हमालमापडी यांची सोय व्हावी असा राज्य शासनाचा प्रयत्न आहे.

राज्यात १ हजार १०० कोटी रुपयांचा मॅग्नेट प्रकल्प २०२१-२२ ते २०२७-२८ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत तालुक्यातील डाळींब, पेरु, द्राक्ष, केळी, आंबा अशा पिकांना चांगली बाजारपेठ मिळावी, निर्यातक्षम चांगले व्यापारी मिळावे, शेतमालाची व्यवस्थितपणे साठवणूक व्हावी या उद्देशाने बारामतीच्या वैभवात भर पडणारी अतिशय देखणी आणि अत्याधुनिक सोई-सुविधायुक्त फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. या सुविधा केंद्राचा शेतकरी व ग्राहकाला मोठ्या प्रमाणात लाभ होणार असून ग्राहकाला ताजी, दर्जेदार फळे व पीके मिळणार आहेत. परिसरातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पवार यांनी केले.

राज्य शासनाने पुढाकार घेवून कांदा व तांदूळ पीकांची निर्यातबंदी उठवली आहे. दूधउत्पादक शेतकऱ्याला ७ रुपयांचे अनुदान देण्यात येत आहे. उत्पादन क्षेत्राजवळ शेतमालांचे संकलन आणि प्रतवारीची सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता प्रयत्न करण्यात येईल. शेतकऱ्यांनी स्पर्धेच्या युगात टिकण्याकरीता कृषी

*(उर्वरित वृत्त पान नं.४ वर...)*

Punyanagari, 10/10/2024

# शेतीमालाच्या साठवणुकीसाठी सुविधा केंद्राची उभारणी : अजित पवार



**पुणे :** राज्यात मॅग्नेट प्रकल्पा मार्फत अकराशे कोटी रुपयांचा प्रकल्प राबविण्यात येत असुन सुविधा केंद्र त्याचाच भाग आहे. पिकांना चांगली बाजारपेठ मिळावी, शेतमालाची साठवून व्हावी या उद्देशाने बारामतीच्या वैभवात भर पाडणारी आणि अत्याधुनिक सोई-सुविधायुक्त फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राची उभारणी करण्यात आली असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीच्या फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते झाले यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सभापती सुनिल पवार, बारामती बाजार समितीचे सर्व सदस्य, मॅग्नेट प्रकल्पाचे संचालक विनायक कोकरे, उपसंचालक डॉ. अमोल यादव व कृषि पणन मंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

पवार म्हणाले की, सुविधा केंद्राचा शेतकरी व ग्राहकाला मोठ्या प्रमाणात लाभ होणार असून ग्राँहकाला ताजी, दर्जेदार फळे व पीके मिळणार आहेत. सुविधा केंद्राचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. यापुढे उत्पादन क्षेत्राजवळ शेतमालांचे संकलन आणि प्रतवारीची सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता प्रयत्न करण्यात येईल. शेतकऱ्यांनी स्पर्धेच्या युगात टिकण्याकरीता कृषी क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अधिकाधिक उत्पादन घ्यावे. अल्प व अत्यल्पभुधारक शेतकऱ्यांनी एकत्रित येवून सामूहिक विक्रीवर भर दिला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

संजय कदम म्हणाले की, फळे व भाजीपाल्याचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे, साठवणूक क्षमता वाढविणे, मुल्यसाखळ्यांमध्ये खाजगी गुंतवणूक आकर्षित करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेतकरी उत्पादक संस्थांचा मुल्यसाखळीतील सहभाग वाढविणे या उद्देशाने महाराष्ट्र शासन व आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रोजेक्ट ( मॅग्नेट ) अंतर्गत महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळने बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केद्राची उभारणी केली आहे. कोल्ड स्टोरेज़, प्रिकुलींग युनिट, पॅक हाऊस, द्राक्ष, केळी व डाळिंबासाठी ग्रेडिंग, सॉर्टिंग, पॅकिंग लाईन, फ्रोजन फ्रुट स्टोरेज, ब्लास्ट फ्रिजर, सोलर सिस्टीम, फायर फायटिंग व सोलर सिस्टिम, मटेरिअल रिसिविंग व डिसपॅच एरिया, स्वच्छता गृह, कॅन्टिन व निवास व्यवस्था, पॅकिंग मटेरिअल स्टोरेज, टेस्टिंग लॅब इत्यादी सुविधा शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी व संबधित घटकांसाठी उपलब्ध झाल्या आहेत.

# ‘मॅग्नेट’अंतर्गत राज्यात ११०० कोटींचे प्रकल्प

## उपमुख्यमंत्री पवार : जळोचीत फळे-भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र

**बारामती :** राज्यात मॅग्नेट प्रकल्पांतर्गत ११०० कोटी रुपयांचा प्रकल्प राबविण्यात येत आहेत. यामुळे डाळिंब, पेरू, द्राक्ष, केळी, आंबा अशा पिकांना चांगली बाजारपेठ मिळणे, शेतीमालाची व्यवस्थितपणे साठवण व्हावी या उद्देशाने जळोची उपबाजार आवारातील अत्याधुनिक सोई-सुविधायुक्त फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्राचा शेतकऱ्यांना फायदा होईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.



**बारामती : कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची उपबाजारातील फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार.**

राज्य शासन व आशियायी विकास बँक अर्थसाह्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पांतर्गत राज्य कृषी पणन मंडळ (पुणे) यांच्या मार्फत बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची उपबाजारातील फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राचे उद्घाटन उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते मंगळवारी (ता. ८) झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, ‘‘मूल्यसाखळी व्यवस्थेमध्ये जवळपास ४० टक्के नुकसान होते, उत्पादन क्षेत्राजवळ शेतीमालाचे संकलन आणि प्रतवारीची सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता प्रयत्न करण्यात येईल. भाजीपाल्याचे होणारे नुकसान टाळण्याकरिता शीतसाखळीगृह उत्पादनावर भर देणे आवश्यक आहे.’’

प्रास्ताविक पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी केले. ते म्हणाले, ‘‘फळे व भाजीपाल्याचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे, साठवणूक क्षमता वाढविणे, मूल्यसाखळ्यांमध्ये खासगी गुंतवणूक आकर्षित करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेतकरी उत्पादक संस्थांचा मूल्यसाखळीतील सहभाग वाढविणे या उद्देशाने मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत पणन मंडळाने बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राची उभारणी केली आहे. या सुविधा केंद्रामध्ये कोल्ड स्टोअरेज, प्रीकूलिंग युनिट, पॅक हाउस, द्राक्ष, केळी व डाळिंबासाठी ग्रेडिंग, सॉर्टिंग, पॅकिंग लाइन, फ्रोझन फ्रूट स्टोअरेज, ब्लास्ट फ्रिजर, सोलर सिस्टीम, फायर फायटिंग व सोलर सिस्टीम, मटेरिअल रिसिविंग व डिसपॅच एरिया, स्वच्छता गृह, कॅन्टीन व निवास व्यवस्था, पॅकिंग मटेरिअल स्टोअरेज, टेस्टिंग लॅब इत्यादी सुविधा शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी व संबंधित घटकांसाठी उपलब्ध आहेत.

बाजार समितीचे सभापती सुनील पवार म्हणाले, की द्राक्ष, केळी, डाळिंब व भाजीपाला उत्पादकांना या सुविधेचा फायदा होईल. कार्यक्रमास बाजार समितीचे सदस्य, मॅग्नेट प्रकल्पाचे संचालक विनायक कोकरे, उपसंचालक डॉ. अमोल यादव व कृषी पणन मंडळाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

सकाळ अॅग्रोवन

# बाजार समित्यांना मिळणार नाममात्र दरात शासकीय जागा

## मात्र व्यावसायिक वापर केल्यास ५० टक्के निधी शासनाला द्यावा लागणार

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : राज्यातील शेतीमालाचा वाढता व्यापार आणि पणन क्षेत्रातील मूल्यवर्धनासाठीच्या पायाभूत सुविधांसाठी बाजार समित्यांकडून जागांची मागणी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने शासकीय जमिनी बाजार समित्यांना नाममात्र १ रुपया दराने देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र या जागांच्या वापरातून गाळे आणि व्यावसायिक वापर केला तर, होणाऱ्या व्यवसायातील ५० टक्के रक्कम शासनाला द्यावी लागणार असल्याची अट शासनाने टाकली आहे. तर अकृषिक आकारणीतून सूट देऊ नये अशी अट देखील टाकली आहे.

बाजार समित्यांमधील पारंपरिक शेतीमाल विक्री व्यवस्था आता, पणन सुधारणांमुळे बाजार आवार अत्याधुनिक होण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये शेतीमाल हाताळणीमध्ये होणारे नुकसान टाळण्यासाठी आणि मूल्यवर्धनासाठी शीतगृहे, प्रतवारी



केंद्रे, पॅकहाऊस आदी सुविधा बाजार समित्यांमध्ये उभारण्यासाठी वाढीव जागांची मागणी वाढत आहे. जागांच्या खरेदीसाठी बाजार समित्यांकडे मुबलक पैसे नसल्याने शासकीय जागांची मागणी वाढली होती. यानुसार विधी व न्याय विभागाचा अभिप्राय घेऊन, शासनाने बाजार समित्यांना नाममात्र दरात जागा देण्यास मान्यता दिली आहे. मात्र या जागांच्या वापरातून गाळे आणि व्यावसायिक वापर केला तर, होणाऱ्या व्यवसायातील ५० टक्के रक्कम शासनाला द्यावी लागणार असल्याची अट शासनाने टाकली आहे. तर अकृषिक आकारणीतून सूट देऊ नये अशी अट देखील टाकली आहे.

### जुन्नर बाजार समितीचे जागा खरेदी प्रकरण चर्चेत

जुन्नर (जि. पुणे) बाजार समितीची ११ एकर जमीन ३० कोटी रुपयांना खरेदी करण्याचे प्रकरण नुकतेच चर्चेत आले होते. नव्या निर्णयामुळे समितीला शासकीय जमीन नाममात्र दरात मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

### जमीन खरेदीचा प्रस्ताव बारगळणार

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विस्तारासाठी यशवंत सहकारी कारखान्याच्या ११७ एकर जमीन खरेदीचा प्रस्ताव संचालक मंडळासमोर आहे. ही जागा खरेदीसाठी किमान ५०० कोटी रुपयांची गरज आहे. नव्या निर्णयामुळे प्रस्ताव बारगळण्याची शक्यता आहे.

Pune, Main
08/10/2024 Page No. 5

Agrowon, 05/10/2024

# ‘ई-नाम’मध्ये अडत्यांना ई-पेमेंटची सुविधा

## राज्यातील ११८ बाजार समित्यांमध्ये असेईंग लॅब कार्यान्वित

अॅग्रोवन वृत्तसेवा

**पुणे :** देश पातळीवर एक बाजार या संकल्पनेवर आधारीत ‘ई-नाम’ योजनेत आता अडत्यांसाठी वजनाची पावती तयार करणे, सेल अॅग्रिमेंट व सेल बिल तयार करणे, शेतकऱ्यांना ई-पेमेंट करणे, डॅशबोर्डद्वारे सुरू असलेले ई-लिलाव पाहणे या सुविधांचा नव्याने ई-नाम संगणक प्रणालीमध्ये समावेश करून त्या कार्यान्वित केल्या आहेत, अशी माहिती राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. याबाबत आडत्यांना ई-नाम संगणक प्रणालीमध्ये ई-पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत केंद्र शासनाकडे मागणी करण्यात आली होती.

याबाबत अधिक माहिती देताना कदम म्हणाले, ‘‘राज्यात आतापर्यंत ई-नाम बाजार समित्यांमध्ये एकूण ४७६ लाख क्विंटल शेतीमालाचा ई-लिलाव झाला असून त्याची किंमत सुमारे १७ कोटी आहे. ई-लिलावाद्वारे सोयाबीन, हरभरा, मका, गहू, ज्वारी, हळद, तूर, उडीद, कांदा, डाळिंब, कोबी, रेशीम कोश या शेतीमालांची प्रामुख्याने विक्री करण्यात येते. शेतीमालाची गुणवत्ता तपासणीसाठी ११८ बाजार समित्यांमध्ये असेईंग लॅब कार्यान्वित असून एकूण १६.३८ लाख लॉट्सचे असेईंग करण्यात आले आहे. ‘ई-नाम’च्या ई-पेमेंट सुविधेद्वारे शेतकऱ्यांना ४४५ कोटी इतकी रक्कम व्यापाऱ्यांनी ऑनलाइन अदा केली आहे.’’

> **केंद्र शासनाने ‘ई-नाम’मध्ये आडत्यांसाठी वजनाची पावती तयार करणे, सेल अॅग्रिमेंट व सेल बिल तयार करणे, शेतकऱ्यांना ई-पेमेंट करणे, डॅशबोर्डद्वारे सुरू असलेले ई-लिलाव पाहणे या सुविधा नव्याने सुरू केल्यामुळे ई-नामअंतर्गत आडत्यांचा सहभाग वाढण्यास मदत होणार आहे. ई-नामअंतर्गत आडत्यांसाठी नव्याने उपलब्ध सुविधांचा त्यांनी लाभ घ्यावा व जास्तीत जास्त व्यवहार ‘ई-नाम’अंतर्गत करावेत जेणेकरून शेतकऱ्यास रास्त भाव मिळण्यास मदत होईल.**
>
> **– संजय कदम, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे**

‘‘अडत्यांसाठी ‘ई-नाम’मध्ये नव्याने दिलेल्या सुविधांबाबत राज्यातील ई-नाम बाजार समित्यांचे सचिव व आडते यांना ऑनलाइन सभेद्वारे माहिती देण्यात आली आहे.

### दृष्टिक्षेपात ‘ई-नाम’

- ११८ बाजार समित्यांमध्ये ई-ऑक्शन सुरू
- शेतकरी नोंदणी - १२ लाख २९ हजार
  एकूण ४७६ लाख क्विंटल मालाची खरेदी विक्री, त्यातून सुमारे १७ कोटींची उलाढाल
- शेतीमालाची गुणवत्ता तपासणीसाठी ११८ बाजार समित्यांमध्ये असेईंग लॅब कार्यान्वित
- ११० बाजार समित्यांमध्ये असेईंग सुरू, एकूण १६ लाख ३८ हजार लॉट्सचे असेईंग
- ७८ बाजार समित्यांमध्ये ई-पेमेंट सुरू, त्यातून सुमारे ४४५ कोटींचा व्यवहार
- खरेदीदार (व्यापारी) नोंदणी २२ हजार ३६६
- आडते नोंदणी १७ हजार ८७४
- शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी ३४१
- आंतरबाजार समिती व्यापार २.६६ लाख क्विंटल, सुमारे १४० कोटी ८७ लाखांची उलाढाल
- आंतरराज्य व्यापारातून १ लाख ५० हजार क्विंटलची खरेदी-विक्री तर ३२ कोटी २६ लाखांची उलाढाल
- शेतकरी उत्पादक कंपनी ८ हजार ९४२ क्विंटल खरेदी-विक्रीतून ४ कोटी ९ लाखांची उलाढाल
- प्रतिलॉट बोली लावण्याचे सरासरी प्रमाण ५.५२
- एकूण ग्रामसभा १ हजार ८२८

# ई-नाममध्ये आडत्यांना ई-पेमेंटची सुविधा

**पुणे :** देशपातळीवर एक बाजार या संकल्पनेवर आधारित ई-नाम ही योजना केंद्र शासनाने सुरू केली आहे. या योजनेचे कामकाज ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्म व मोबाइल ॲपद्वारे सुरू आहे. केंद्र शासनाच्या ई-नाम योजनेंतर्गत देशातील १ हजार ३८९ बाजार समित्या ई-नामला जोडल्या असून राज्यातील १३३ बाजार समित्या ई-नामला जोडल्या आहेत. या बाजार समित्यांमध्ये ई-नाम कार्यप्रणालीनुसार कामकाज सुरू आहे.

राज्यात आतापर्यंत ई-नाम बाजार समित्यांमध्ये एकूण ४७६ लाख क्विंटल शेतमालाचा ई-लिलाव झाला असून, त्याची किंमत १७ हजार ६०७ कोटी रुपये इतकी आहे. ई-लिलावाद्वारे सोयाबीन, हरभरा, मका, गहू, ज्वारी, हळद, तूर, उडीद, कांदा, डाळिंब, कोबी, रेशीम कोष या शेतमालाची प्रामुख्याने विक्री करण्यात येते. शेतमालाची गुणवत्ता तपासणीसाठी ११८ बाजार समित्यांमध्ये असेईंग लॅब कार्यान्वित असून एकूण १६.३८ लाख लॉट्सचे असेईंग करण्यात आले आहे. ई-नामच्या ई-पेमेंट सुविधेद्वारे शेतकऱ्यांना ४४५ कोटी रुपये इतकी रक्कम व्यापाऱ्यांनी ऑनलाइन अदा केली आहे.

प्रचलित पद्धतीनुसार, राज्यातील बाजार समित्यांमधील आडते शेतमालाच्या विक्रीचे नियोजन करून शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीची रक्कम अदा करतात. ई-नाम कार्यप्रणालीनुसार नोंदणीकृत व्यापाऱ्याने ई-लिलाव केल्यानंतर ई-नाम संगणक प्रणालीमार्फत ई-पेमेंट करतात. या ई-पेमेंटमध्ये शेतकऱ्यांचे पेमेंट, बाजार समितीची बाजार फी व आडत यांचा समावेश असतो. एकंदरीत, ई-नाममध्ये व्यापारी हा केंद्रबिंदू आहे. प्रचलित पद्धतीनुसार आपल्या राज्यासह इतर राज्यांमध्ये सुद्धा पेमेंट आडत्या मार्फत केले जाते. यामुळे आडत्यांना ई-नाम संगणक प्रणालीमध्ये ई-पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत केंद्र शासनाकडे मागणी होती. या मागणीचा विचार करून केंद्र शासनाने आडत्यांसाठी वजनाची पावती तयार करणे, सेल ॲग्रीमेंट व सेल बिल तयार करणे, शेतकऱ्यांना ई-पेमेंट करणे, डॅशबोर्डद्वारे सुरू असलेले ई-लिलाव पाहणे या सुविधांचा नव्याने ई-नाम संगणक प्रणालीमध्ये समावेश करून कार्यान्वित केल्या आहेत. आडत्यांसाठी ई-नाममध्ये नव्याने दिलेल्या सुविधांबाबत राज्यातील ई-नाम बाजार समित्यांचे सचिव व आडते यांना ऑनलाइन सभेद्वारे माहिती देण्यात आली आहे. शेतकऱ्यांना बाजार समितीत शेतमाल घेऊन जाण्यापूर्वी मोबाईल ॲपद्वारे गेट एण्ट्री करण्याबाबत सुविधा दिली असून, या सुविधेद्वारे शेतकरी बाजार समितीत शेतमाल घेऊन जाण्यापूर्वी मोबाईल ॲपद्वारे गेट एण्ट्री करू शकतात. या गेट एण्ट्रीचा क्यूआर कोड तयार होत असून क्यूआर कोड बाजार समितीच्या गेटवर स्कॅन केल्यानंतर त्या शेतमालाबाबतची नोंद (गेट एण्ट्री) ई-नाम संगणक प्रणालीमध्ये होणार आहे. या सुविधेमुळे शेतमाल बाजार समितीत येण्याअगोदर शेतकरी गेट एण्ट्री करणार असल्याने बाजार समित्यांना गेटवर आवकेची नोंद घेण्यासाठी लागणाऱ्या वेळेत बचत होऊन एण्ट्री गेटवर गर्दी होणार नाही.

केंद्र शासनाने ई-नाममध्ये आडत्यांसाठी वजनाची पावती तयार करणे, सेल ॲग्रीमेंट व सेल बिल तयार करणे, शेतकऱ्यांना ई-पेमेंट करणे, डॅशबोर्डद्वारे सुरू असलेले ई-लिलाव पाहणे या सुविधा नव्याने सुरू केल्यामुळे ई-नामअंतर्गत आडत्यांचा सहभाग वाढण्यास मदत होणार आहे. केंद्र शासनाने ई-नामअंतर्गत आडत्यांसाठी नव्याने उपलब्ध केलेल्या सुविधांचा आडत्यांनी लाभ घ्यावा व जास्तीत जास्त व्यवहार ई-नामअंतर्गत करावेत; जेणेकरून शेतकऱ्यास रास्त भाव मिळण्यास मदत होईल.
– संजय कदम, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ

Punyanagari, 04/10/2024

Pudhari, 03/10/2024

# ई-नाममध्ये अडत्यांमार्फत शेतकऱ्यांना ई-पेमेंट सुविधा

## संगणक प्रणालीमध्ये समावेश करून अंमलबजावणी सुरू

- पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांची माहिती
- शेतमालाच्या ऑनलाइन व्यवहारात अधिक पारदर्शकता

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतमालाच्या ई-नामद्वारे होणाऱ्या शेतमाल व्यापारातील विक्रीची रक्कम अडत्यांमार्फत थेट ई-पेमेंटद्वारे करण्याची सविधा केंद्र सरकारने आता समाविष्ट केलेली आहे. त्यामुळे शेतमालाची ऑनलाइन व्यापार-व्यवहारात अधिक पारदर्शकता येण्यास मदत होणार असल्याची माहिती राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.**

केंद्र सरकारने देशपातळीवर 'एक बाजार' या संकल्पनेवर आधारित ई-नाम ही योजना सुरू केली आहे. या योजनेचे कामकाज ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्म व मोबाईल ॲपद्वारे सुरू आहे. केंद्र शासनाच्या ई-नाम योजनेअंतर्गत देशातील १ हजार ३८९ बाजार समित्या ई-नामला जोडल्या असून, त्यामध्ये महाराष्ट्रातील १३३ बाजार समित्यांचा समावेश आहे. ई-लिलावाद्वारे सोयाबीन, हरभरा, मका, गहू, ज्वारी, हळद, तूर, उडीद, कांदा, डाळिंब, कोबी, रेशीमकोष या शेतमालाची प्रामुख्याने विक्री करण्यात येते. शेतमालाची गुणवत्ता तपासणीसाठी ११८ बाजार समित्यांमध्ये प्रयोगशाळा कार्यान्वित आहेत.

प्रचलित पद्धतीनुसार राज्यातील बाजार समित्यांमधील अडते शेतमालाच्या विक्रीचे नियोजन करून शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीची रक्कम देतात. ई-नाम कार्यप्रणालीनुसार नोंदणीकृत व्यापाऱ्याने ई-लिलाव केल्यानंतर ई-नाम संगणक प्रणालीमार्फत ई-पेमेंट करतात. या ई-पेमेंटमध्ये शेतकऱ्यांचे पेमेंट, बाजार समितीची बाजार फी व अडत यांचा समावेश असतो. एकंदरीत ई-नाममध्ये व्यापारी हा केंद्रबिंदू आहे. पेमेंट अडत्यांमार्फत केले जाते. यामुळे अडत्यांना ई-नाम संगणक प्रणालीमध्ये ई-पेमेंटची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत केंद्र शासनाकडे मागणी करण्यात आली होती. त्याचा विचार करून केंद्राने आता अडत्यांसाठी वजनाची पावती तयार करणे, सेल ॲग्रिमेंट व सेल बिल, ई-पेमेंट करणे, डॅशबोर्डद्वारे सुरू असलेले ई-लिलाव पाहणे, या सुविधांचा नव्याने ई-नाम संगणक प्रणालीमध्ये समावेश करून कार्यान्वित केल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यात आत्तापर्यंत ई-नाम बाजार समित्यांमध्ये सप्टेंबर २०१७ ते ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत एकूण ४७६ लाख क्विंटल शेतमालाचा ई-लिलाव झाला आहे. त्याची किंमत १७ हजार ६०७ कोटी रुपये आहे.

### शेतकऱ्यांना मोबाईल ॲपद्वारे गेट एन्ट्री सुविधा लवकरच

मोबाईल ॲपच्या सुविधेद्वारे शेतकरी बाजार समितीत शेतमाल घेऊन जाण्यापूर्वी गेट एन्ट्री करू शकतात. या गेट एन्ट्रीचा क्यूआर कोड तयार होत असून, हा क्यूआर कोड बाजार समितीच्या गेटवर स्कॅन केल्यानंतर त्या शेतमालाबाबतची नोंद (गेट एन्ट्री) ई-नाम संगणक प्रणालीमध्ये होणार आहे. त्यामुळे प्रवेशद्वारावर होणारी गर्दी टाळता येणार आहे.

Loksatta, 03/10/2024

# बाजार समित्यांची आज राज्यस्तरीय परिषद

**पुणे :** राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती व सचिव यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे गुरुवारी (३ ऑक्टोबर) आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद निगडी प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात होणार, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

कदम म्हणाले, की महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, अल्पसंख्याक विकास व पणन मंत्री अब्दुल सत्तार उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासह सहकार व पणन, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नहाटा, राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती उपस्थित राहणार आहेत. शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोई-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व उपाययोजना इत्यादी विषयांच्या अनुषंगाने संवाद साधण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

Punyanagari, 02/10/2024

# ३०५ बाजार समित्यांची पुण्यात उद्या राज्यस्तरीय परिषद

**पुणे** : राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती व सचिव यांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन गुरुवार, ३ ऑक्टोबर रोजी निगडी येथील छत्रपती संभाजी महाराज चौकातील ग. दि. माडगुळकर नाट्यगृहात करण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

राज्यस्तरीय परिषदेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री अब्दुल सत्तार उपस्थित राहणार आहेत. सहकार व पणन, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नहाटा, राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, सचिव, राज्य बाजार समिती संघाचे सदस्य उपस्थित राहणार आहेत.

राज्यातील बाजार समित्यांच्या कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतमालाच्या विपणनामध्ये अंगीकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोयीसुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना इत्यादी विषयांच्या अनुषंगाने संवाद साधण्यासाठी या परिषदेचे आयोजन केले आहे. यावेळी राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, बाजार समितीनिहाय विकास आराखडा, बाजार समित्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडीअडचणी व उत्पन्न वाढीसाठी करावयाच्या उपाययोजना आदीबाबत चर्चा करण्यात येणार आहे. मंडळामार्फत राज्यातील ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उप बाजारांच्या माध्यमातून राज्यात उत्पादित शेतमालाची सुरळीत विक्री व्यवस्था विकसित करण्याचे कामकाज गेल्या ४० वर्षांपासून सुरू आहे.

Pudhari, 02/10/2024

संक्षिप्त

## बाजार समित्यांच्या अडचणींवर ऊहापोह करण्यासाठी उद्या राज्यस्तरीय परिषद

**पुणे :** राज्यातील बाजार समित्यांच्या कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतमालाच्या विपणनामध्ये (मार्केटिंग) अंगीकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोयी-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजनांवर ऊहापोह करण्यासाठी उद्या गुरुवारी (दि. ३) राज्यातील सर्व बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद निगडीत आयोजित करण्याची आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. या वेळी राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, बाजार समितीनिहाय विकास आराखडा, बाजार समित्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडीअडचणी व उत्पन्नवाढीसाठी करावयाच्या उपाययोजना आदींबाबत चर्चा करण्यात येणार आहे. ३ ऑक्टोबरला निगडी प्राधिकरणातील ग. दि. माडगुळकर नाट्यगृहात ही परिषद होईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दुपारी तीन वाजता उद्घाटन करण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणनमंत्री अब्दुल सत्तार उपस्थित राहणार आहेत. सहकार व पणन, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नहाटा, राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, सचिव, राज्य बाजार समिती संघाचे सदस्य उपस्थित राहणार आहेत.

Kesari, 02/10/2024

# भौगोलिक मानांकन कायद्यात होणार सुधारणा

**हरकती पाठवण्याचे आवाहन**

**नवी दिल्ली :** एखाद्या प्रदेशातील विशिष्ट उत्पादनाला खास मानांकनाद्वारे संरक्षण मिळवून देणाऱ्या 'भौगोलिक मानांकन कायद्या'त सुधारणा करण्याचे सरकारने ठरवले आहे. यावर १० ऑक्टोबर पर्यंत हरकती पाठवण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे. याबाबत तज्ज्ञांकडून कायद्यात सुधारणा करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार देशांतर्गत व्यापार व उद्योग विभागाकडून कार्यवाहीही सुरू करण्यात आली आहे.

विशिष्ट भौगोलिक प्रदेशातील कृषी उत्पादन, नैसर्गिक किंवा मानवी हस्तकला उद्योग यांना जगभरात ओळख मिळवून देण्यासाठी 'भौगोलिक मानांकन' आवश्यक असते. त्यांना दिलेल्या नामाभिधानेच त्यांना ओळखले जाते. उत्पादनाच्या उत्तम प्रतिसांठी ती ओळखली जातात. कोणीही व्यक्ती, संस्था असे




मानांकन मिळण्यासाठी अर्ज करू शकतात. त्याची वैधता १० वर्षे आहे. या कालवधीत नोंदणीकृत व्यक्ति किंवा संस्थेशिवाय इतर कोणी त्या नावाने त्या प्रकारचे उत्पादन विकू शकत नाही. भारतात भौगोलिक मानांकने मिळतील अशी किमान १० हजार उत्पादने आहेत. त्यामुळे त्या सर्वांना सामावून घेण्यासाठी प्रचलित कायद्यात बदल करणे गरजेचे आहे.

सरकारी संस्थांनी भौगोलिक मानांकनासाठी अर्ज करू नये. असाही सूर आहे. कारण त्यामुळे सर्वसामान्यांना त्याचा फारसा लाभ घेता येत नाही. सध्या एकूण भौगोलिक मानांकनापैकी सुमारे ३० टक्के मानांकने सरकारी संस्थांच्या नावावर आहेत. यासाठी नोंदणी करण्याच्या पद्धतीतही क्रांतीकारी बदल घडवून त्यात पारदर्शकता आणणे आवश्यक आहे. पेटेंट, व्यापारी चिन्हे, बौद्धिक संपदा कायदा याप्रमाणे भौगोलिक मानांकन नोंदणीही सुलभ व्हावी, अशी मागणी पुढे येत आहे.

बासमती तांदूळ, दार्जिलिंग चहा, चंदेरी धागे, म्हैसूर रेशीम, कलू शाली, कांग्रा चहा, तंजावरची चित्रकला, काश्मीपमधील आक्रोडावरील कलाकुसर ही काही भौगोलिक मानांकनाची प्रसिद्ध उदाहरणे आहेत. पॅरिस परिषदेतील निर्णयानुसार भौगोलिक मानांकनाला आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटनेकडूनही साहाय्य मिळते. भौगोलिक मानांकन कायद्यात सुधारणा केल्याने भारताताच्या विविधतेच्या संकल्पनेला अनुसरून असणाऱ्या अनेक भौगोलिक उत्पादनांना नवी ओळख मिळून ग्रामीण भारताच्या अर्थकारणाला बळ मिळेल, अशी अपेक्षा आहे.

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2024-10-01 | Page- 2
epaper.mahamtb.con

# बाजार समित्यांची परिषद पुण्यात

**पुणे :** 'महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे'मार्फत राज्यातील ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उपबाजारांचे माध्यमातून शेतमालाची विक्री व्यवस्था विकसित करण्याचे कामकाज गेल्या ४० वर्षांपासून सुरु आहे. हे करीत असताना राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणाबरोबरच सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय नियोजनाचे कामकाजही करण्यात येत आहे. 'कृषी पणन मंडळा'ने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे तसेच शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्यातील बाजार समित्यांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत. या अनुषंगाने संवाद साधण्यासाठी मंत्री अब्दुल सत्तार यांनी राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती व सचिव यांची गुरुवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी ग. दि. माडगुळकर नाट्यगृह, छत्रपती संभाजी महाराज चौक निगडी येथे परिषदेचे आयोजन करण्याचे निर्देश दिले आहेत.

पुण्य नगरी

# गुरुवारी राज्यातील बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद

**महाराष्ट्र राज्य कृषी व पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांची माहिती**

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने वतीने राज्यातील ३०५ बाजार समित्यांसाठी राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन येत्या गुरुवार, दि. ०३ ऑक्टोबर रोजी करण्यात आले असल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. ही परिषद निगडी येथील छत्रपती संभाजी महाराज चौक येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे होणार आहे.

या राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पणनमंत्री अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

नियोजन, सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे सभापती प्रविणकुमार नहाटा हे देखील उपस्थित असणार आहेत. तसेच राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, सचिव, राज्य बाजार समिती संघाचे सदस्य यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे.

राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, बाजार समितीनिहाय विकास आराखडा, बाजार समित्यांना त्यांचे दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडचणी व उत्पन्न वाढीसाठी करावयाच्या उपाययोजना इत्यादीबाबत चर्चा या परिषदेमध्ये अपेक्षित असल्याची माहितीही कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे मार्फत राज्यातील ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उपबाजारांच्या माध्यमातून राज्यात उत्पादित शेतमालाची सुरळीत विक्री व्यवस्था विकसीत करण्याचे कामकाज गेल्या ४० वर्षापासून सुरु आहे. हे करीत असताना राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणाबरोबरच सुसूत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय नियोजनाचे कामकाजही करण्यात येत आहे. कृषि पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबध्द प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचबरोबर राज्यातील बाजार समित्यांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत.

राज्यात कृषि मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करुन त्यांचेमार्फत निर्यातवृध्दी करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत. हे कामकाज करीत असताना, राज्यातील बाजार समित्यांचे कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतमालाच्या विपणनामध्ये अंगीकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोई-सुविधा, त्यामध्ये येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने परिषदेचे आयोजन केल्याचेही कदम यांनी सांगितले.

Pune Edition
Oct 01, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

Kesari, 01/10/2024

# निगडीमध्ये बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद

**पुणे** : राज्यातील बाजार समित्यांच्या कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतमालाच्या विपणनामध्ये अंगिकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर घटकांना द्यावयाच्या सोयी-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यांवर करावयाच्या उपाययोजना या विषयाच्या अनुषंगाने संवाद साधण्यासाठी महाराष्ट्र राज्य, कृषी पणन मंडळ पुणे यांनी राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती व सचिव यांची गुरुवार, ३ ऑक्टोबर २०२४ रोजी निगडी येथील ग.दि. माडगूळकर नाट्यगृह येथे राज्यव्यापी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या संदर्भात महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणेचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले की, या राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पणनमंत्री अब्दुल सत्तार, सहकार, पणन, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रविणकुमार नहाटा, तसेच राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, सचिव, राज्य बाजार समिती संघाचे सदस्य हे उपस्थित राहणार आहे.

राज्यातील ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उपबाजारांच्या माध्यमातून राज्यात उत्पादित शेतमालाची सुरळीत विक्री व्यवस्था विकसित करण्याचे कामकाज गेल्या ४० वर्षांपासून सुरू आहे. हे करीत असताना राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणा बरोबरच सुसूत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय नियोजनाचे कामकाजही करण्यात येत आहे. तसेच या परिषदेमध्ये राज्यातील बाजार समित्यांचे आधुनिकीकरण, बाजार समितीनिहाय आराखडा, बाजार समित्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडीअडचणी व उत्पन्न वाढीसाठी करावयाच्या उपाययोजना इत्यादींबाबत चर्चा अपेक्षित असल्याचे कदम यांनी सांगितले.

Agrowon, 01/10/2024

# पुणे येथे बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद गुरुवारी

## मुख्यमंत्री आणि पणनमंत्री करणार मार्गदर्शन

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : जागतिकीकरण, डिजिटायझेशनमुळे शेतीमाल पणन सुधारणांना वेग आला आहे. पारंपरिक पणन कायदा आणि व्यवस्थेतून शेतीमाल विक्री सुलभ आणि पारदर्शी होण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून विविध सुधारणा करण्यात येत आहे. या सुधारणांना सामोरे जाताना, बाजार समिती सभापती, पदाधिकारी, सचिव आणि कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे निगडी (पिंपरी चिंचवड) येथे गुरुवारी (ता. ३) पणन मंडळाच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

या बाबतची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. कदम म्हणाले, ''राज्यातील ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उपबाजारांच्या माध्यमातून शेतीमालाची विक्री व्यवस्था गेल्या ४० वर्षांपासून सुरू आहे. हे करीत असताना राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणाबरोबरच सुसूत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय नियोजनाचे कामकाजही करण्यात येत आहे. पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचबरोबर राज्यातील बाजार समित्यांचे पदाधिकारी, अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत. तसेच कृषी मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करुन त्यांच्यामार्फत निर्यातवृद्धी करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत.

हे कामकाज करीत असताना, राज्यातील बाजार समित्यांचे कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतीमालाच्या विपणनामध्ये अंगीकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोई-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाय योजना इत्यादी विषयांच्या अनुषंगाने पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शनातून परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नहाटा उपस्थित असणार आहेत.

अहमदनगर
दि.01/10/2024

महत्वाचे

# बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद ३ ऑक्टोबर रोजी

मुंबई–राज्यातील बाजार समित्यांच्या कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतमालाच्या विपणनामध्ये अंगीकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोयी–सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना इत्यादी विषयांच्या अनुषंगाने संवाद साधण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती व सचिव यांची गुरुवार ३ ऑक्टोबर २०२४ रोजी ग. दि. माडगुळकर नाट्यगृह, छत्रपती संभाजी महाराज चौक, प्राधिकरण, निगडी, पुणे येथे राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणेचे कार्यकारी संचालक, संजय कदम यांनी दिली.

अॅग्रोवन

# पुणे येथे बाजार समित्यांची राज्यस्तरीय परिषद गुरुवारी

## मुख्यमंत्री आणि पणनमंत्री करणार मार्गदर्शन

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : जागतिकीकरण, डिजिटायझेशनमुळे शेतीमाल पणन सुधारणांना वेग आला आहे. पारंपरिक पणन कायदा आणि व्यवस्थेतून शेतीमाल विक्री सुलभ आणि पारदर्शी होण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून विविध सुधारणा करण्यात येत आहे. या सुधारणांना सामोरे जाताना, बाजार समिती सभापती, पदाधिकारी, सचिव आणि कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसीय राज्यस्तरीय परिषदेचे निगडी (पिंपरी चिंचवड) येथे गुरुवारी (ता. ३) पणन मंडळाच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

या बाबतची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. कदम म्हणाले, ''राज्यातील ३०५ बाजार समित्या व त्यांचे ६२३ उपबाजारांच्या माध्यमातून शेतीमालाची विक्री व्यवस्था गेल्या ४० वर्षांपासून सुरू आहे. हे करीत असताना राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणाबरोबरच सुसूत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय नियोजनाचे कामकाजही करण्यात येत आहे. पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचबरोबर राज्यातील बाजार समित्यांचे पदाधिकारी, अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहेत. तसेच कृषी मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करुन त्यांच्यामार्फत निर्यातवृद्धी करण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत.

हे कामकाज करीत असताना, राज्यातील बाजार समित्यांचे कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतीमालाच्या विपणनामध्ये अंगीकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोई-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाय योजना इत्यादी विषयांच्या अनुषंगाने पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शनातून परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, पणन संचालक विकास रसाळ, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रवीणकुमार नहाटा उपस्थित असणार आहेत.